## गर्भाशयातील बाळाच्या वाढीस मोबाईल रिंगमुळे धोका

सतत मोबाईल फोन येत असतील तर वाजणारी रिंग गर्भाशयातील बाळास घातक आहे. तसेच बाळाचे झोपण्याचे व जागे राहण्याचे चक्रच बिघडून जाते. रिंगच्या केवळ आवाजामुळेच नाही तर स्पंदनांमुळेही त्याचे झोपेचे चक्र बिघडते. ज्या गरोदर महिलांवर हे प्रयोग करण्यात आले, त्यांच्यात तर खूप वाईट परिणाम दिसले. काहींचे वेळेआधीच बाळंतपण झाले, तर काहींचा रक्तदाबाचा त्रास वाढला, काही मुलांचे वजन जन्मतः कमी होते. असे असले तरी मोबाईलच्या आवाजामुळेच हे सगळे परिणाम होत असावेत, याची अजून खातरजमा करण्यात आली नाही.



## हिवाळ्यात अशी घ्या ओठांची काळजी

नोव्हेंबर महिन्यापासून थंडीची चाहूल लागते. या दिवसांमध्ये शरीरातील आर्द्रता कमी झाल्याने त्वचा कोरडी पडते. ज्यांची त्वचा जास्त कोरडी असते, त्यांचे ओठही कोरडे पडतात. ओठांची त्वचा निघते, कधी कधी ओठातून रक्तही येऊ लागते. ओठ सारखे कोरडे पडत असल्याने त्यावरून नकळत जिभ फिरवली जाते. पण यामुळे ते तात्पुरते ओले होतात आणि काही वेळातच पूर्वपदावर येतात. याशिवाय बाजारात सहज उपलब्ध होणारे लिप बाम, मॉईश्चरायझर यांचा ओठ मुलायम राहण्यासाठी वापर केला जातो. परंतु अशा सौंदर्यप्रसाधनांमुळे बरेचदा या कोरडेपणाचे प्रमाण वाढते. त्यामुळे घरच्या घरी करता येतील असे काही सोपे उपाय पाहूयात...



**• लोणी किंवा तूप लावा** - लोणी आणि तूप हे अतिशय उत्तम नैसर्गिक मॉईश्चरायझर आहेत. रोज रात्री झोपताना ओठांना लोणी किंवा तूप लावल्यास त्याचा चांगला फायदा होतो. हलक्या हाताने हे लावून मसाज केल्यास ओठ फाटणे कमी होईल.

**• एरंडेल तेल**
थोडेसे व्हॅसलिन घेऊन त्यात एरंडेल तेल घालावे. हे मिश्रण दिवसातून दोनदा ओठांना लावावे. त्यामुळे ओठ मुलायम होण्यास मदत होते.



**• मोहरीचे तेल** - मोहरीचे तेल अनेक समस्यांसाठी उत्तम उपाय असते. थंडीच्या दिवसात दर दिवशी नाभीत मोहरीच्या तेलाचे दोन ते तीन थेंब टाकल्यास त्याचा चांगला फायदा होतो. यामुळे ओठ फाटण्याची समस्या कमी होण्यास मदत होते.

**• गुलाबपाणी** - गुलाबपाणी कोरड्या ओठांसाठी अतिशय उत्तम उपाय आहे. एका लहान चमचा गुलाबपाण्यामध्ये तीन ते चार थेंब ग्लिसरिन टाकून ठेवावे. दिवसातून तीन ते चार वेळा हे मिश्रण ओठांना लावल्याने ओठांचा कोरडेपणा कमी होण्यास मदत होते.



## 'हे' पदार्थ ठरू शकतात आरोग्यास घातक

आपली प्रकृती सांभाळण्यात आपल्या आहाराचा वाटा मोठा असतो. आहार आपल्या आरोग्यावर बराच परिणाम करतो. पौष्टिक खाणे हे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असते, हे माहिती असतानाही जिभेचे चोचले पुरवण्यासाठी आपण अनेकदा जंक फूड खातो. यामध्ये असणारे घटक आरोग्यासाठी घातक असतात. हे पदार्थ अधिक प्रमाणात खाल्ल्यास आरोग्य बिघडवण्यास कारणीभूत ठरू शकतात. आरोग्याच्या दीर्घकालीन समस्यांसाठी अपायकारक असणारे पदार्थ आणि त्यामुळे आरोग्याला होणारे त्रास यांबाबत माहिती घेऊया...

**● मैदा** - मैदा हा शरीराला चांगला नसतो, असे आपण अनेकदा ऐकतो, मात्र समोसा, पाव, बिस्किटे यांच्या माध्यमातून आपण मैदा खातोच. मैद्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. तसेच मैद्यामुळे किडनी आणि यकृताच्या समस्या उद्‌भवतात. मैद्यामुळे हृदयाशी निगडित आजार वाढण्याचीही शक्यता असते.



**● मीठ** - कोणत्याही पदार्थात मीठ नसेल तर त्या पदार्थाला चवच येणार नाही. मात्र पदार्थ तयार करताना मीठ घातलेले ठीक आहे. पण वरून मीठ घालून खाणे आरोग्यासाठी अतिशय घातक असते. जास्त मीठ खाल्ल्याने उच्च रक्तदाबाचा धोका उद्‌भवू शकतो. तसेच मिठाचा आहारात जास्त वापर केल्यास कर्करोग आणि ऑस्टिओपोरॅसिसही होण्याची शक्यता असते.

**● शीतपेये** - शीतपेये आरोग्यासाठी घातक असतात. ती तयार करताना मोठ्या प्रमाणात साखर आणि फॉस्फरिक ॲसिडचा वापर केला जातो. शीतपेयांमध्ये असणाऱ्या घटकांमुळे मेंदूची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता असते. तसेच शीतपेयांच्या जास्त सेवनाने हृदयाशी निगडित समस्या उद्‌भवतात.

**● जायफळ** - जायफळ खाल्ल्याने हृदय सुदृढ होते. तसेच जायफळामुळे मेंदूची शक्ती कमी होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे जायफळ कधीतरी, तेही अगदी थोड्या प्रमाणात आहारात घ्यावे, मात्र त्याचा अतिवापर आरोग्यास घातक ठरू शकतो.

**● साखर** - उसावर प्रक्रिया करून साखर तयार केली जाते. साखर ही मधुमेहाचे एक महत्त्वाचे कारण आहे. रक्तातील साखर वाढल्यास आरोग्याच्या अनेक समस्या उद्‌भवतात. याशिवाय साखर खाल्ल्याने हृदयाच्या समस्या, यकृत आणि किडनीच्या समस्या निर्माण

## निरोगी आरोग्यासाठी अक्रोड खाणे फायदेशीर



आहारामध्ये नियमित स्वरूपात अक्रोडचा वापर केल्यास भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढत असणाऱ्या हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजार, कर्करोग आणि मधुमेह या आजारापासून दूर राहणे शक्य असल्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधकांनी सांगितले आहे.

आहार, हृदय व रक्तवाहिन्या, आकलन क्षमता, अल्झायमर आणि मधुमेह या क्षेत्रांतील संशोधक आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या झालेल्या बैठकीमध्ये भारतातील आरोग्य स्थिती, आहार घेण्याची पद्धत, आरोग्याची स्थिती आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. कॅलिफोर्नियाच्या अक्रोड आयोगाने आयोजित केलेल्या या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेत अक्रोड हे रोगप्रतिबंधक असून, त्यामुळे नागरिकांची जीवनशैली निरोगी राहण्यास मदत होत असल्याचे सांगण्यात आले.

संशोधकांनी केलेल्या अभ्यासामध्ये अक्रोड खाण्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. अक्रोड खाल्ल्यामुळे आरोग्यविषयक समस्या जसे की, हृदयविकार, कर्करोग, वृद्धत्व आणि मधुमेह दूर होत असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे.

लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारासंबंधी आजार भारतामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. प्रामुख्याने शहरी भागातील नागरिकांमध्ये योग्य प्रमाणात आहार घेतला जात नाही. त्यामुळे शरीराला आवश्यक ते पोषक घटक मिळत नाहीत. लहान मुलांमध्ये ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे, असे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्लीच्या माजी मुख्य आहार तज्ज्ञ डॉ. रेखा शर्मा यांनी म्हटले आहे. अमेरिका आणि चीननंतर लठ्ठपणा असलेल्या देशात भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतीय लोकांनी आहारामध्ये जास्तीत जास्त फळे, भाज्या, शेंगदाणे आणि सुकामेवा यांचा वापर करणे आवश्यक असल्याचे शर्मा यांनी म्हटले आहे.

सुकामेवा हा फॅटी ॲसिडचा समृद्ध स्रोत आहे. तसेच यामध्ये ओमेगा-३ फॅटी आहे. त्यामुळे हृदय निरोगी राहण्यास मदत होते, असे त्या म्हणाल्या. भारतामध्ये स्मृतिभ्रंशाचा आजार १० टक्क्यांनी वाढला असून, २०१०च्या तुलनेत या आजारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अक्रोड खाणे यावर फायदेशीर असल्याचे त्यांनी सांगितले.

## वर्षभर आंघोळीसाठी कोमट पाणी वापरावे

अंघोळीसाठी फार कढत किंवा फार गार पाणी न वापरता वर्षभर अंघोळीसाठी कोमट पाणी वापरावे. ड्रायरचा वापर करण्यापूर्वी टेल कोंबच्या सहाय्याने केसांचे सेक्शन्स करून घ्यावेत आणि मगच ड्रायरने केस वाळवावेत.



## पचनशक्ती कमकुवत असल्यास हे योगासन करा

सध्याची दगदगीची आणि धावपळीची अनियमित जीवनशैली आणि खाण्या-पिण्याच्या वाईट सवयींमुळे प्रत्येक तिसरा माणूस पोटाच्या कोणत्या न कोणत्या तक्रारीने झुंजत आहे. योग्य खाण्या-पिण्याच्या आणि शारीरिक हालचालींच्या अभावी मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत पचनासंबंधी त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अशात दररोज नेमाने योगासन करावे; जेणे करून पचनाशी निगडित अडचणींवर विजय मिळवता येईल.

**कपालभाती प्राणायाम** -
कपालभाती प्राणायाम करण्यासाठी गुसिद्धासन, पद्मासन किंवा वज्रासनात बसावे आणि आपल्या तळहाताला गुडघ्यावर ठेवा. गुडघ्याला धरून शरीराला ताठ ठेवा. आपली पूर्ण क्षमता लावून सामान्यांपेक्षा थोडा दीर्घ श्वास घेत आपली छाती फुगवा. नंतर झटक्यात श्वास सोडत पोटाला आत ओढा. जसे आपण आपल्या पोटाच्या स्नायूंना सैल सोडतो, तेव्हा श्वास आपोआपच फुफ्फुसात पोहोचतो. या प्राणायामाचा सराव केल्याने पोटाला फायदा होतो आणि अतिरिक्त चरबी कमी होते.

**मत्स्यासन** -
मत्स्यासन करण्यासाठी दंडासनात बसून उजव्या पायाला डाव्या पायावर ठेवून मणक्याचे हाड ताठ ठेवा. हातांच्या सहाय्याने मागील बाजूस कोपर टेकवून झोपा. पाठ आणि छाती ताठ असावी आणि गुडघे जमिनीवर टेकवून ठेवा. आता आपल्या हाताने पायाचे अंगठे धरून ठेवा आणि दीर्घ श्वास घ्या. लक्षात ठेवा की, आपले कोपर जमिनीला लागलेले असावे. हे आसन शरीराच्या थकव्याला कमी करते आणि पोटाची सूज कमी करते. हे आसन पोट आणि ओटीपोटास उत्तेजित करून पोटातील गॅस, सूज आणि अपचनास दूर करतं.

**धनुरासन** -
या आसनाच्या सरावामुळे बद्धकोष्ठता, पाठदुखी, पोटाची सूज, थकवा येणं आणि मासिक पाळीचे त्रास दूर होतात. या आसनाच्या सरावासाठी सर्वप्रथम पोटावर झोपा. आपले गुघडे दुमडून कंबरेजवळ न्या आणि आपल्या तळपायांना हाताने धरून ठेवा. श्वास घेत छातीला जमिनीपासून वर उचला. पायांना पुढे ओढा आता आपल्याला स्वतःला संतुलनात ठेवून समोर बघा. या आसनाला करण्यासाठी सरावाची गरज असते, म्हणून हळूहळू याचा अभ्यास करा. १५-२० सेकंदांनंतर आपले पाय आणि छाती हळूहळू जमिनीकडे आणा.



## दिनविशेष

### १४ फेब्रुवारी

- १८७६: अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल व एलिशा ग्रे यांनी एकाच दिवशी टेलिफोनच्या पेटंटसाठी अर्ज केला.
- १८८१: भारतातील पहिल्या होमिओपाथिक कॉलेजची कोलकाता येथे स्थापना.
- १८९९: अमेरिकेत निवडणुकांसाठी मतदान यंत्रे वापरण्यास सुरूवात झाली.
- १९२४: संगणक तयार करणारी कंपनी आय.बी.एम ची स्थापना.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ रॉयल एअर फोर्स च्या विमानांनी तुफानी बॉम्बफेक करुन जर्मनीतील ड्रेस्डेन शहर बेचिराख केले.
- १९४५: चिली, इक्वेडोर, पॅराग्वे व पेरू या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९४६: पहिला संगणक एनियाक युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियात प्रदर्शित करण्यात आला.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | | 5 | | | | 6 | 4 |
| | 4 | | | | 8 | 7 | | |
| | 7 | 8 | 1 | | | 9 | | |
| 7 | | | | | | | | |
| | | | 3 | 7 | 9 | 2 | | |
| | | 9 | | 1 | 4 | 3 | 5 | |
| | 5 | 2 | | 3 | 6 | 4 | 7 | |
| | 1 | | | | | 6 | 8 | |
| | 8 | | | 9 | | | 3 | |

### उत्तर सुडोकू - ५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 7 | 3 | 5 | 1 | 9 | 6 | 2 |
| 9 | 1 | 5 | 4 | 2 | 6 | 7 | 8 | 3 |
| 2 | 3 | 6 | 7 | 8 | 9 | 5 | 4 | 1 |
| 3 | 9 | 4 | 8 | 1 | 5 | 6 | 2 | 7 |
| 1 | 6 | 2 | 9 | 7 | 4 | 3 | 5 | 8 |
| 5 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 6 | 4 | 3 | 1 | 9 | 8 | 2 | 7 | 5 |
| 7 | 5 | 1 | 6 | 4 | 2 | 8 | 3 | 9 |
| 8 | 2 | 9 | 5 | 3 | 7 | 4 | 1 | 6 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.



## १४ फेब्रुवारीला का साजरा केला जातो व्हॅलेंटाईन्स डे, खास आहे याची गोष्ट

व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस मानला जातो. बहुतेक देशांमध्ये व्हॅलेंटाईन्स डे साजरा केला जातो. या दिवशी कपल्स एकमेकांवर असलेले प्रेम व्यक्त करतात. व्हॅलेंटाईनबद्दल अनेक प्रेमकथा आहेत पण व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यासाठी १४ फेब्रुवारी हा दिवस का निवडला गेला हे तुम्हाला माहिती आहे का?

कशी झाली व्हॅलेंटाईन्स डेची सुरुवात

'ऑरिया ऑफ जॅकोबस डी वॉराजिन' नावाच्या पुस्तकानुसार सेंट व्हॅलेंटाईन हे रोमचे धर्मगुरू होते. जगात प्रेम वाढवण्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्यासाठी आयुष्य फक्त प्रेमात होते. पण या शहराचा राजा क्लॉडियस याला त्याचे बोलणे आवडले नाही. राजाला वाटले की पुरुषांची बुद्धिमत्ता आणि शक्ती या दोन्ही गोष्टी प्रेम आणि लग्नाने संपतात. या कारणास्तव त्याच्या राज्यात सैनिक आणि अधिकारी विवाह करू शकत नव्हते. सेंट व्हॅलेंटाईनने राजा क्लॉडियसच्या या आदेशाला विरोध केला आणि रोमच्या लोकांना प्रेम आणि विवाहासाठी प्रेरित केले. एवढेच नाही तर अनेक अधिकारी आणि सैनिकांचे विवाहही त्यांनी केले. यामुळे राजा संतप्त झाला आणि त्याने १४ फेब्रुवारी २६९ रोजी सेंट व्हॅलेंटाइनला फाशी दिली. त्या दिवसापासून दरवर्षी हा दिवस 'प्रेमाचा दिवस' म्हणून साजरा केला जातो. संत व्हॅलेंटाईनने मृत्यूशय्येवर असलेल्या जेलरची अंध मुलगी जेकोबस यांना डोळे दान केले होते असे म्हटले जाते. सेंटने जेकोबसला एक पत्र देखील लिहिले, ज्याच्या शेवटी त्याने 'युवर व्हॅलेंटाईन' लिहिले. प्रेमासाठी बळी पडलेल्या व्हॅलेंटाइनची ही कथा होती.

## हीच ती भूमिका जिने मला कणखर बनवले ! - मृणाल कुलकर्णी



छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास, पराक्रम, स्वराज्यध्यास वाचत आणि पाहत घडलेल्या पिढीची मी पण एक भाग आहे. व्यक्ती म्हणून शिवराज्य समजून घेणे मला नेहमीच भावतं पण अभिनेत्री म्हणून मला शिवराज्याने जास्तच घडवले याचा अभिमान वाटतो. महाराष्ट्राचा फेवरेट कोण? २०२३ या झी टॉकीज वाहिनीने जाहीर केलेल्या पुरस्कार सोहळ्यात मला एक नव्हे तर दोन पुरस्कार दिले. पहिला पुरस्कार म्हणजे सुभेदार या सिनेमातील जिजाऊ आऊसाहेब जिजाबाई या भूमिकेसाठी प्रेक्षकांच्या पसंतीचा महाराष्ट्राची फेवरेट सहाय्यक अभिनेत्री हा पुरस्कार तर दुसरा पुरस्कार म्हणजे शिवाजी महाराजांच्या आऊसाहेब जिजाबाई यांची भूमिका साकारण्याची संधी हा माझ्यासाठी पुरस्कारापेक्षा कमी सन्मान नाही. अशा शब्दात अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्राचा फेवरेट कोण? पुरस्कार सोहळ्यात सुभेदार या सिनेमातील जिजाऊ आईसाहेबांच्या भूमिकेसाठी अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांना प्रेक्षक पसंतीतून दिला जाणारा महाराष्ट्राची फेवरेट सहाय्यक अभिनेत्री हा पुरस्कार मिळाला. शिवराज अष्टक मालिकेतील पाचवे पुष्प असलेल्या सुभेदार या सिनेमातील जिजाऊंच्या भूमिकेसाठी मृणाल कुलकर्णी स्पर्धेत होत्या. महाराष्ट्रातील प्रेक्षकांनी या भूमिकेला पसंतीचा कौल दिला आणि महाराष्ट्राचा फेवरेट कोण? २०२३ या पुरस्कारावर मृणाल कुलकर्णी यांचे नाव कोरले गेले.




## 'व्हॅलेन्टाईन्स डे' विशेष रोमँटिक चित्रपट 'एक ती'

महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांचं फेब्रुवारीच्या गुलाबी थंडीत उबदार मनोरंजन करण्यासाठी एक ती चित्रपटाचा व्हॅलेन्टाईन्स डेचे औचित्यसाधून अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर वर्ल्ड डिजिटल प्रीमियर करण्यात आला. या चित्रपटाचे दिग्दर्शन अमर सुनील पारखे यांनी केले असून चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेते विजय कदम, अनिकेत केळकर तसेच शेषपाल गणवीर, हर्ष गावडे आणि रूपाली जाधव हे नवोदित कलाकार चित्रपटात हटक्या भूमिकेत ओटीटी प्रेक्षकांचे बेमालूम मनोरंजन करीत आहेत. व्यक्ती आवडणं. प्रेम व्यक्त करणं. प्रेमात बेधुंद होणं. वाट्याला विरह येणं. हे सगळं या चित्रपटात पहायला मिळणार असून या सर्व भावनांना आणखी ठळक करत, मनाचा ठाव घेणारी गाणी प्रेक्षकांना हळवं करीत आहेत. कष्टाळू आणि जबाबदार युवक ते निधीच्या प्रेमात वेडा झालेल्या विनयचा वेड्यांच्या इस्पितळात जाण्यापर्यंतचा प्रवास चित्रपटात पहायला मिळणार आहे. प्रेमाने जग जिंकण्याएवढी ताकत असते असं म्हणतात, अशाच प्रेमातून आजच्या युवकांना आयुष्यातील एक प्रेरणादायी धडा शिकवणारा चित्रपट एक ती प्रदर्शित करताना मन हर्षित होत आहे.

## भविष्य

**मेष** शुक्राचं राश्यांतर अश्विनी नक्षत्राच्या व्यक्तींना व्यावसायिक उत्सव-समारंभातून उत्तम बोलेल. काहींना कर्जमंजुरीतून मोठा दिलासा मिळेल.

**वृषभ** छंद वा उपक्रमांतून प्रकाशात आणतील. विशिष्ट कोर्टप्रकरण मार्गी लागेल. वास्तुविषयक व्यवहार होतील.

**मिथुन** सरकारी कामे होतील. आर्द्रा नक्षत्राच्या व्यक्तींना ओळखीचा लाभ होईल. रस्त्यावर चालताना जपून. सुवार्तांतून धमाल उडवेल.

**कर्क** उत्तम लाभ होईल. पती वा पत्नीचा भाग्योदय. मात्र सप्ताहारंभ व्यावसायिक भागीदारीच्या संदभार्तून वाद निर्माण करू शकतो.

**सिंह** आज कुटुंबाच्या विस्ताराविषयी संवाद साधतील. प्रेमी जोडपी आज एकमेकांसोबत वेळ घालवून आनंदी होतील. आज पैशांची गुंतवणूक करताना सावधानता बाळगा.

**कन्या** आज तुमच्या समर्पण आणि मेहनतीच्या जोरावर तुम्हाला आर्थिक लाभ मिळेल. मालमता किंवा पैशांची देवाणघेवाण करताना खूप सावध राहा. व्यवसायात एखादे आवश्यक काम सहजतेने पूर्ण होईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा

**वृश्चिक** उत्पन्नाचे नवे स्त्रोत शोधण्याचा प्रयत्न करा. व्यावसायिकांना गिऱ्हाईकांच्या फीडबॅकचा विचार करावा लागेल. नोकरदार लोकांनी त्यांचे टार्गेट पूर्ण केल्याने ते सुटकेचा निःश्वास सोडतील.

**धनु** आज मोठा धनलाभ होण्याची देखील शक्यता आहे. तुमच्या चालू प्रोजेक्टमध्ये तुमच्या मेहनतीची प्रशंसा होऊ शकते. नोकरीत मनाजोगती प्रगती होण्याचे योग आहेत.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** आज कुंभ राशीच्या लोकांना जरा जपून राहावे लागणार आहे. प्रेम संबंधात असणाऱ्या लोकांसाठी दिवस सामान्य राहील. आज देण्याघेण्याच्या व्यवहारात खूप सावध राहण्याची गरज आहे.

**मीन** आज तुमच्या मनात स्वतःचे काम सोडून दुसऱ्यांना मदत करण्याची भावना जागृत होईल. तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तीकडे आपल्या मनातील गोष्ट व्यक्त कराल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

# अशोकरावांचा ‘आदर्श’!

आजमितीस अभिनंदन अशोक चव्हाण यांचे करावे की भाजपचे हा सर्वात मोठा गहनगंभीर प्रश्न ठरतो. अशा परिस्थितीत ते दोघांचेही करणे इष्ट. हे दोनही घटक अभिनंदनास तितकेच पात्र ठरतात. अशोक चव्हाण यांनी एकदा काय तो निर्णय घेतला, हे बरे झाले. त्यासाठी ते अभिनंदनीय. महाराष्ट्रात कोणीही फुटणार अशी वदंता आली की पहिल्यांदा गेली काही वर्षे अशोकरावांचे नाव घेतले जायचे. म्हणजे फुटणारी व्यक्ती अशोक चव्हाण असेल याची खात्री राजकारणाच्या व्हॉट्सएपी निरीक्षकांसही होती. हा जसा या निरीक्षकांच्या चाणाक्षतेचा मोठेपणा तशीच ती अशोक चव्हाण यांच्या विश्वासार्हतेचीही पावती च म्हणायची. इतक्या प्रत्येकास एखादा नेता जेव्हा संभाव्य फुटीर वाटत असतो तेव्हा त्या नेत्यांची पुण्याई किती हेही दिसून येते. हा एक भाग. दुसरीकडे भाजपचे अभिनंदन करण्याचे कारण सोमवारच्या ताज्या घटनेपुरतेच मर्यादित असणार नाही. जेव्हा अशोकराव भाजपत जातील त्या वेळी ही घटनामालिका पूर्ण होईल. तूर्त भाजपचे अभिनंदन अशासाठी की अशोक चव्हाण हे आपले संभाव्य लक्ष्य आहे याची हवा त्या पक्षाने इतक्या प्रदीर्घपणे निर्माण केली की काही दिवसांनी सोनिया वा राहुल गांधी यांनीच अशोकरावांस तुमच्या भाजप प्रवेशाचे काय , असे विचारले असते. ही वेळ अशोकरावांनी आणली नाही आणि ती येण्याच्या आधीच पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला. इतकी वर्षे एका पक्षात काढल्यावर जरा थारेपालट हवा, अशा अर्थाचे विधान अशोकरावांनी केले. सध्या सर्वपक्षीयांस थारेपालटासाठी एकमेव आधार आहे.

तो म्हणजे अर्थातच भाजप. तेव्हा आज ना उद्या अशोकराव भाजपत जातील हे निश्चित. तिकडे बिहारात नितीशकुमार यांची दुसरी वा तिसरी (की चवथी) घरवापसी विधानसभेत यशस्वी ठरत असताना महाराष्ट्रातही अशोकरावांनी भाजपत जाण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यात काही आश्चर्य नाही. अशोकरावांच्या साथीने आणखीही काही आमदार काँग्रेसमध्ये गेले तरीही आश्चर्य नाही. आजकाल मूळ भाजपवासीयांपेक्षा अन्य पक्षांतील ज्येष्ठांना भाजपत बरे दिवस आलेले आहेत. अशोकराव तर माजी मुख्यमंत्री. परत माजी मुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांचेही ते सुपुत्र. म्हणजे डबल पॉवरफुल. तेव्हा अशी व्यक्ती आपल्या गळाला लागली तर भाजप कशाला सोडेल? यात प्रश्न इतकाच होता की अशोकरावांचा घास घ्यायला इतका वेळ का लागला? गेली काही वर्षे संभाव्य फुटिरांत अग्रमानांकित असलेले अशोकराव अजूनही भाजपवासी झालेले नाहीत. सोमवारी त्यांनी त्या दिशेने पहिले पाऊल टाकले. म्हणजे काँग्रेसचा राजीनामा दिला. तो देताना आपल्या आमदारकीचाही त्यांनी त्याग केला. आपली यानंतरची भूमिका लवकरच सांगू असे ते म्हणतात. याचा अर्थ इतक्या वर्षांच्या संभाव्य फुटीरतेच्या चर्चेनंतरही अशोकरावांस निर्णय घेण्यास अजून दोन-चार दिवस हवे आहेत. कदाचित पुढील दोन दिवसांत भाजपचे माजी अध्यक्ष आणि आजी गृहमंत्री अमित शहा यांच्या होऊ घातलेल्या महाराष्ट्र दौऱ्यात ते अधिकृतपणे भाजपत प्रवेश करतील. भाजपतर्फे राज्यसभेची उमेदवारीही त्यांना कदाचित मिळेल. त्या पक्षात सद्यःस्थितीत अन्य पक्षीयांचेच स्वपक्षीयांपेक्षा भले होते. त्यामुळे उद्या भाजपत जाणाऱ्या अशोकरावांना परवा भाजपचे तिकीट मिळेलही. पण त्यानिमित्त भाजपसही एका आज्ञाधारक नेत्याचा लाभ होईल. काँग्रेसमधील आपल्या वास्तव्यात अशोकराव हे पक्षश्रेष्ठींचा माणूस असेच ओळखले जात. ही सवय त्यांना भाजपत अत्यंत उपयोगी पडेल. ही नेतृत्वनिष्ठा ही अशोकरावांच्या रक्तातच असावी. आणीबाणीच्या काळात अशोकरावांचे पिताश्री शंकरराव चव्हाण यांनी काँग्रेसचे तत्कालीन पक्षश्रेष्ठी संजय गांधी यांची पादत्राणे वाहिली होती. त्या वेळी त्यांच्यावर सडकून टीका झाली होती. पण शंकरराव बधले नाहीत की त्यांनी महाराष्ट्राची माफीही मागितली नाही. पक्षप्रमुखांच्या चरणी निष्ठा वाहणे याचा हा मूर्तिमंत धडा. तो घरातल्या घरातच मिळालेला असल्याने अशोकरावांना तो भाजपतील भावी वास्तव्यात प्रगतिपथावर जोमाने घेऊन जाईल, हे निश्चित. आणि दुसरे असे की यानिमित्ताने तरी त्यांच्या मानेवरील आदर्श घोटाळ्याचे भूत कायमचे उतरवले जाईल. मुंबईतील आदर्श नामक इमारतीच्या घोटाळ्यात सहभाग असल्याचे सिद्ध झाल्याने अशोकरावांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले होते. तेव्हापासून ते भूत त्यांच्या मानेवर बसले ते बसलेच. जेव्हा केव्हा अशोकरावांनी जरा काही हालचाल केली, भाजपवर आरोप वगैरे करण्याचा प्रयत्न केला की लगेच आदर्श घोटाळ्याची फाइल पुन्हा खुली करण्याची चर्चा सुरू होई. परिणामी कासव कसे संकटाची चाहूल लागली की आपले शरीर आकसून घेते तसे अशोकराव स्वतःस आकसून घेत. ही त्यांची कुचंबणा आता कायमची दूर होईल. बरोबर दहा वर्षांपूर्वी नांदेड येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहा महिन्यांत अशोक चव्हाण यांस आदर्श घोटाळ्यासाठी तुरुंगात पाठवू असे आश्वासन मतदारांस दिले होते. काही दिवसांतच अशोकराव भाजपत जातील. सर्व घोटाळे करून, पचवून ताठ मानेने जगू इच्छिणाऱ्यांसाठी सद्यःस्थितीत भाजपखेरीज अन्य पर्याय नाही. तोच अशोकरावांनी निवडला. त्याबद्दल त्यांना दोष देण्यात काय हशील. हे झाले अशोकरावांचे काय भले झाले याबद्दल.

# देवा तूचि गणेशु, सकल मति प्रकाशु....



श्री गणेश ही एक संकल्पना आहे. श्री गणेश ही एक स्वयंभू देवता आहे; परंतु प्रत्येकाला तिच्याशी संपर्क साधता यावा, प्रार्थना करता यावी यासाठी पंचमहाभूतांच्या साह्याने जी मूर्ती पार्थिव रूपात साकार होते, ती गणपती म्हणून प्रसिद्ध आहे.

श्री गणेश ही एक संकल्पना आहे. श्री गणेश ही एक स्वयंभू देवता आहे; परंतु प्रत्येकाला तिच्याशी संपर्क साधता यावा, प्रार्थना करता यावी यासाठी पंचमहाभूतांच्या साह्याने जी मूर्ती पार्थिव रूपात साकार होते, ती गणपती म्हणून प्रसिद्ध आहे.

**संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची सुरवात श्री गणेशवंदनाने केलेली आहे,**
**ॐ नमो जी आद्या वेद प्रतिपाद्या,**
**जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा,**
**देवा तूचि गणेशु सकल मति प्रकाशु,**
म्हणे निवृत्ती दासु अवधारिजो जी

ज्या व्यक्ती व जो समाज पौराणिक पातळीवर जगतो, त्यांच्यासाठी मंदिरात श्री गणेशाच्या मूर्ती स्थापन केलेल्या असतात. श्री गणेशांच्या एका बाजूला ऋद्धि, एका बाजूला सिद्धि अशा स्त्री शक्तीसुद्धा आकारात आलेल्या दिसतात. तेव्हा स्वयंभू असो किंवा मानवी आकारात असो, श्री गणेशांचे पूजन व प्रार्थना या श्रद्धेमुळे फलदायी असतात. महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी भाद्रपद महिन्यात येणाऱ्या या गणेशोत्सवात पार्थिव गणेशाची पूजा केली जाते. घरोघरी गणपतीची पार्थिव मूर्ती आणली जाते आणि गणेशाची उपासना केली जाते. त्यावेळी जो विषय समाजात चर्चेत असतो त्या विषयाला धरूनही श्रीगणेशांच्या मूर्ती केलेल्या आढळतात.

समाजधारणा व्हावी, समाजात काही चांगले विचार रुजवावे, या दृष्टीने घरोघरी होणाऱ्या उत्सवाला लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक उत्सवाचे रूप दिले. घरात प्राणप्रतिष्ठा केलेली वा सार्वजनिक मंडळांनी बसविलेली श्री गणेशांची मूर्ती कितीही चांगली, सुंदर, भव्य बनविलेली असली तरी अनंतचतुर्दशीच्या दिवशी मूर्तीचे विसर्जन करावेच लागते, असा हा पार्थिव गणेश. जे पार्थिव गणेशाची पूजा करतात आणि ज्यांनी ऋषिमुनींनी सांगितलेल्या, चराचरात उपस्थित असलेल्या परमशक्ती व परमेश्वरी संकल्पनेचे अस्तित्व व श्रद्धा हा जीवनाचा मुख्य आधार आहे, असे समजून घेतलेले आहे, त्यांच्यासाठी हा उत्सव महत्त्वाचा ठरतो. या उत्सवाच्या निमित्ताने गणेशाशी एकरूप होऊन त्याला आपली सुख-दुःखे सांगता येतात. गणेश ही एक संकल्पना आहे, ही एक स्वयंभू देवता आहे. स्वयंभू म्हणजे निसर्गतः आणि देवता म्हणजे एखादी संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी असलेली शक्ती आणि अधिकार. जगाच्या कल्याणासाठी अगदी सुरवातीला, आद्य श्रौत देवता म्हणून तयार झालेली अशी ही देवता आहे. ब्रह्मणस्पती व वाचस्पती असल्यामुळे वक्तृत्व, लोकसंग्रह, लोककल्याण यासाठीही आशीर्वाद देणारी आहे.

वस्तुमान, शक्ती आणि संकल्पना, यातून सर्व जगाच्या पसाऱ्याची योजना करणे, त्याची वाढ करणे व हा पसारा चालविण्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या निर्णयासाठी विवेकबुद्धी देणे या सर्वांसाठी श्री गणेश देवता आवश्यक असते. भौतिक किंवा शारीरिक पातळीवर संपकार्साठी प्रथम लिंगस्वरूपात व नंतर मानवी स्वरूपात स्वीकारलेली असते. स्वयंभू मूर्तीचे विसर्जन केले जात नाही. यांचा उत्सव माघ महिन्यात साजरा केला जातो.

अष्टविनायक माहात्म्य

महाराष्ट्रातील अष्टविनायक प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी असलेल्या मूर्ती मनुष्याने तयार केलेल्या नाहीत, तर तेथे स्वयंभू पाषाण आहेत, आणि ज्यातून प्रसारित होणारे शक्तितरंग जाणवू शकतात, त्यांच्याशी संभाषण होऊ शकते आणि मनोवांछित कामना पूर्ण करण्यासाठी त्यांची मदत घेता येते, असा अनेकांचा अनुभव आहे. अष्टविनायकांबाबत बरेच मतप्रवाह आढळून येतात.

प्रचलित अष्टविनायक जसेच्या तसे असतीलच असे नाही. प्रणम्य शिरसा देवम या स्तोत्रात गणपतींची बारा नावे आहेत. त्यापैकी काही नावे अष्टविनायकांमध्ये दिसतात. अष्टविनायकांची सर्व मंदिरे या गणेश कथांमध्ये येतात असे नाही. परंतु एक निश्चित की, या मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेतले, उपासना केली तर कष्ट दूर होतात ही भाविकांची श्रद्धा असते व तसा अनेकांचा अनुभव असतो.

अष्टविनायकदर्शन घेणे, संकल्प करून एखादी गोष्ट ठरविलेल्या कालावधीसाठी नियमाने करणे म्हणजे व्रत. उदा. २१ चतुर्थ्या करणे, एखादा गणेशमंत्र रोज विशिष्ट वेळा म्हणणे वगैरेंमुळे दुष्कर्माच्या फळातून मुक्ती मिळते, अशी भाविकांची भावना असते. श्री गणपती ही कलियुगातील महत्त्वाची देवता आहे. गणपतीची उपासना म्हणजेच आपल्या मेंदूची उपासना. प्रत्येक कर्म, प्रत्येक घटना मेंदूत नोंदवली जाते. कमार्नुसार चांगले-वाईट फळ मिळत असते. तेव्हा मनुष्याने सज्जनतेने राहून, माणुसकी जपून, आपल्याला शक्य आहे ते चार लोकांना देऊन मैत्री वाढवून, दानधर्म, तपस्या करत राहिले तर हे सद्वर्तन अष्टविनायकांच्या दर्शनाने सिद्ध व्हायला मदत होईल. अष्टविनायक ही श्री गणेशांची मुख्य स्थाने. गणेश ही एक संकल्पना आहे. श्री गणेश ही एक स्वयंभू देवता आहे; परंतु प्रत्येकाला तिच्याशी संपर्क साधता यावा, प्रार्थना करता यावी यासाठी पंचमहाभूतांच्या साह्याने जी मूर्ती पार्थिव रूपात साकार होते, ती गणपती म्हणून प्रसिद्ध आहे. खरे पाहता श्री गणपती ही एक दैवी संकल्पना आहे. ही दैवी संकल्पना आकारात आणताना एक सुपारीसारखी ग्रंथी किंवा लिंगस्वरूप पाषाण हाच आकार पुरेसा ठरला व पार्थिवाची सुरवात झाली. एखादा तेजोमय आणि इतर दगडापेक्षा जास्त आणि विशेष प्रकारची स्पंदने देणारा पाषाण घेऊन त्यावर श्री गणपतीचे आवाहन केले तर असा स्वयंभू गणपती प्रार्थनेसाठी अधिक उपयोगी ठरतो. या स्वयंभू स्थानातील देवतांचे विसर्जन होत नाही. कोकणात हर्चरीजवळ खेडकुळी येथे आम्हा तांबे कुटुंबीयांचे स्वयंभू गणपतीचे मंदिर आहे. गणपतीपुळे येथील मंदिरात आणि खेडकुळीच्या श्री गणपतीच्या मंदिरात दर्शनाला गेले असता सारख्याच शक्तिप्रवाहाचा अनुभव मला येत असे. आमच्या पूर्वजांपैकी एकजण प्रत्येक चतुर्थीला गणपतीपुळ्याला दर्शनाला जात असत.

एका चतुर्थीला खूप ताप आलेला असल्यामुळे ते उठून स्नान करू शकत नव्हते, गणपतीपुळ्याला चालत जाण्याचा प्रश्नच नव्हता. आज मला श्री गणपतींचे दर्शन होणार नाही, या विचाराने त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. तापामुळे ग्लानीत असताना त्यांना प्रत्यक्ष श्री गणपतीचे दर्शन झाले व दृष्टांत झाला, ह्यऊठ, डोक्यावरून पाणी घे, घराच्या पलीकडे अमुक ठिकाणी ये, तेथे मी प्रकट होऊन तुला दर्शन देतो.


दृष्टांतानुसार त्यांनी तापातच स्नान केले, गणपतींनी सांगितलेल्या ठिकाणी पोहोचले आणि खरोखरच गणपतीपुळ्याच्या गणपतीने त्यांना तेथे दर्शन दिले. श्री गणपती जेथे प्रकट झाले तेथेच हे मंदिर आहे. म्हणूनच गणपतीपुळ्याच्या व आमच्या घरचे गणपतीचे मंदिर या दोन्ही ठिकाणी एकाच तऱ्हेची शक्तीची स्पंदने जाणवतात.

या मंदिराच्या व्यवस्थेचा, पूजेचा अधिकार तांबे घराण्याकडे आहे. येथे माघी चतुर्थीच्या निमित्ताने दरवर्षी चार दिवसांचा उत्सव असतो. केवळ तांबे घराण्यातीलच नव्हे तर अन्य अनेक मंडळीही या उत्सवासाठी येतात. हा श्री गणपती पावतो असा अनेकांचा अनुभव असल्यामुळे बरीच मंडळी येथे येऊन श्री गणपतीला साकडे घालतात. गणपतीची उपासना म्हणजेच मेंदूची उपासना. त्यामुळे असाध्य व मेंदूच्या विकारांवर श्री गणेश हेच मोठे औषध आहे. दिवा लावून रोज श्रीगणेशस्तोत्र, श्री अथर्वशीर्ष किंवा ह्यॐ गँ गणपतये नमःह्न वगैरे शास्त्रशुद्ध पद्धतीने गाणे, सामाजिक व सामुदायिक एकात्मतेसाठी प्रयत्न करणे तसेच गरजवंतांना मदत करणे हे व्रत उपयोगी पडेल.

# Ungulates, small mammals spotted near Samruddhi Expressway during wildlife study

**Mumbai:** The camera traps placed at wildlife underpasses and overpasses along the Samruddhi Expressway between Nagpur and Sinnar captured evidence of the diverse wildlife species inhabiting the area which included ungulates, small mammals and carnivores. Researchers claimed that these observations will significantly assist in assessing the effectiveness of wildlife mitigation measures along the Samruddhi expressway.

The Wildlife Institute of India (WII) signed a year-long Memorandum of Understanding with Maharashtra State Road Development Corporation (MSRDC) to monitor the use of the mitigation measures on the expressway and began a monitoring study of the crossing structures earlier this year. The monitoring exercise is being carried out using camera traps to record wild animals using a total of 1797 mitigation structures of 11 types including wildlife underpasses and overpasses were constructed on sensitive stretches on the expressway. These included 7 wildlife overpasses, 17 wildlife underpasses and



2 tunnels within WFAs, in addition to those outside WFAs.

The WII said that the study will further analyse what structures are more efficient and which ones are not. With this aim, the monitoring team deployed 64 camera traps across the wildlife overpasses and wildlife underpasses along the expressway. Animals spotted near Samruddhi Expressway/ Sourced PhotoAnimals spotted near Samruddhi Expressway/ Sourced Photo The team spotted varied wildlife species including herds of large ungulates like Nilgai (Boselaphus tragocamelus), chinkara, and wild pig (Sus scrofa), smaller mammals like the Indian hare (Lepus nigricollis), Indian crested porcupine (Hystrix indica) and mongoose (Herpestidae), carnivores like a leopard (Panthera pardus) and grey langur (Semnopithecus entellus). Samruddhi Expressway--a crucial project linking Mumbai and Nagpur--is a 701-km0long road passing through three varied habitat types which are dry deciduous forests near Nagpur, grasslands in the middle section and Western Ghats near the end of the expressway in Mumbai.

# Supreme Court quashes defamation complaint against Tejashwi Yadav

**New Delhi** | The Supreme Court Tuesday quashed the defamation complaint against Rashtriya Janatat Dal leader Tejashwi Yadav over his alleged "only Gujaratis can be thugs" remark after he agreed to withdraw the statement The Supreme Court Tuesday quashed the defamation complaint against Rashtriya Janatat Dal leader Tejashwi Yadav over his alleged "only Gujaratis can be thugs" remark after he agreed to withdraw the statement. A bench of Justices A S Oka and Ujjal Bhuyan granted the relief to the former Bihar deputy chief minister on his plea seeking to transfer the defamation trial to a court outside Gujarat, newswire PTI reported. "We have quashed the case in view of petitioner withdrawing his statement on record. Accordingly disposed of," the bench said.

The top court on February 5 had reserved its order on a plea filed by Tejaswani Yadav seeking transfer of the criminal defamation complaint pending against him in a Ahmedabad court over his alleged "only Gujaratis can be thugs" remark to a place outside the state, preferably Delhi. The apex court on January 29 had directed Yadav to file a "proper statement" withdrawing his alleged remark that "only Gujaratis can be thugs".

Yadav on January 19 filed an affidavit in the apex court withdrawing his alleged "Gujarati thugs" remark. The top court, while hearing the Rashtriya Janata Dal leader's plea, had earlier stayed the proceedings in the criminal defamation complaint and issued notice to the Gujarat resident who had filed it. The complaint against Yadav was filed for alleged criminal defamation, the PTI news report said.

# 'Delhi Chalo' march

## CJI takes note of traffic issues, says SC will accommodate if lawyers face problem in reaching court



**New Delhi** | The assurance from a bench led by CJI Chandrachud came in the morning when the bench assembled to hear the proceedings. The court said that if any lawyer faces a problem with traffic issues, the bench will accomodate The farmers' protest has been called by the Sanyukt Kisan Morcha (Non-Political) and Kisan Mazdoor Morcha. They are demanding the enactment of a law guaranteeing a minimum support price (MSP) and the implementation of recommendations of the Swaminathan Commission. Massive security arrangements have been put in place on the borders of the national capital because of the 'Delhi Chalo' protest. Delhi Police have already enforced Section 144, restricting the entry of tractor trolleys and large assemblies as part of measures to maintain law and order. Meanwhile, Supreme Court Bar Association (SCBA) President Adish Aggarwala on Tuesday wrote a letter to Chief Justice of India (CJI), DY Chandrachud to take suo motu action against erring farmers for forcibly trying to enter Delhi in a bid to create nuisance and disturb the daily life of citizens.

# पुण्यात 20 फेब्रुवारीपासून ओला, उबर बंद




**पुणे। प्रतिनिधी,**

पुणे आणि चिंचवड मधील कॅब चालकांनी कामबंद आंदोलन पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे येत्या 20 फेब्रुवारीपासून शहरातील ओला उबेरची सेवा बंद राहणार आहे. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कॅब चालकांकडून पुणे येथील आरटीओ ऑफिस येथे निदर्शने करण्यात येणार आहेत. 20 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या कामबंद आंदोलनात शहरातील जवळपास 20 हजारांहून अधिक कॅबचालक सहभागी होणार, असा दावा डॉ. केशव क्षीरसागर यांनी केला आहे.

जवळपास 20 हजार कॅब चालक आंदोलनात सहभागी प्रादेशिक परिवहन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी कॅब कंपन्यांसाठी दर पत्रक जाहीर केले. 1 जानेवारी 2024 पासून नवीन दर लागू झाले आहेत. मात्र आलो उबेरयासरख्या कंपन्या प्रत्यक्षात त्या दराची अद्याप अंमलबजावणी करत नाही. परिणामी याचा फटका कॅब चालकांना बसत आहे. नवीन दर लागू झाल्यास कॅब चालकांना मिळणाऱ्या कमिशनमध्ये वाढ होईल, आणि वाढीव दराचा व्यवसायावर परिणाम होईल. या भीतीने कॅब सेवा देणाऱ्या कंपन्यांनी अद्याप दराची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे 20 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता संगम ब्रिजजवळ आरटीओ कार्यालयासमोर कॅब चालक एकत्रित येतील, असं निदर्शने करणार आहेत. या आंदोलनात सुमारे 20 हजार कॅब चालक सहभागी होणार असल्याचा दावा डॉ. केशव क्षीरसागर यांनी केला आहे.

# Incarcerated Imran Khan rejects options to form coalition govt with PML-N, PPP and MQM

**Islamabad** | Former Pakistan Prime Minister Imran Khan, currently incarcerated in Rawalpindi's Adiala Jail, has ruled out the possibility of forming a coalition government with Pakistan Muslim League-Nawaz (PML-N), Pakistan Peoples Party (PPP), and Muttahida Qaumi Movement (MQM) Former Pakistan Prime Minister Imran Khan, currently incarcerated in Rawalpindi's Adiala Jail, has ruled out the possibility of forming a coalition government with Pakistan Muslim League-Nawaz (PML-N), Pakistan Peoples Party (PPP), and Muttahida Qaumi Movement (MQM).

The 71-year-old Khan, also the founder of the Pakistan Tehreek-e-Insaaf (PTI) party, was speaking with journalists at the



high-security Adiala Jail in Rawalpindi. Khan and many of his party colleagues are lodged in jail for many months in connection with convictions in multiple cases, newswire PTI reported. Following the recent general elections where independent candidates, largely supported by Khan's Pakistan Tehreek-e-Insaaf (PTI) party, secured 101 seats in the 266-member National Assembly, negotiations for coalition formation have been underway between PML-N and PPP due to the lack of a clear majority. However, Khan's firm stance has shifted the political landscape, leaving the possibility of an alternative coalition open. Khan said there would be no talk with the PML-N, the PPP, and the Muttahida Qaumi Movement (MQM) but expressed willingness to contact all other parties and groups. "There can be no alliance with PML-N, PPP, and MQM," he said, adding that he had directed PTI Information Secretary Raouf Hasan to bring together all parties except the three parties. Khan also alleged that elections were rigged and said it would increase instability in the country and negatively impact the economy. He kept saying that free and transparent elections were the only solution. "Such electoral fraud never happened in the history of the country." "Attempts are being made to bring down the money laundering syndicate to power. The Sharif family is the biggest money launderer of the country," he alleged and added that the country's biggest problem was dollars and alleged that the Sharif family would send dollars abroad.

"Those who have been brought [to rule] are the biggest money launderers," Khan was quoted as alleging by Geo News portal. The PTI founder further claimed that both Nawaz Sharif and his daughter Maryam Nawaz lost the elections and said, "We are the first to challenge the election results. We will also approach the Supreme Court against the election results."

# बदलापूरच्या लोडशेडींगला लवकरच 'टाटा'

## वीज पुरवठ्यासाठी महावितरणला टाटा कंपनीकडून मिळणार ४०० मेगावॅट वीज

■ **बदलापूर** : विजेच्या लपंडावाने हैराण असलेले बदलापूरकर लवकरच लोडशेडींगला 'टाटा' करणार आहेत. बदलापूरात महावितरणला सुरळीत वीजपुरवठा करता यावा यासाठी टाटा कंपनीकडून ४०० मेगावॅट वीज उपलब्ध करून देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.त्यामुळे आगामी काळात बदलापूरकरांची विजेच्या लपंडावातून सुटका होण्याची चिन्हे आहेत.

■ महावितरणने सहमती दर्शवली असल्याने टाटा कंपनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे बदलापूरात प्रकल्प उभारणीसाठी प्रस्ताव सादर करणार आहे.त्यांच्याकडून परवानगी मिळताच १८ महिन्यांत बदलापूरात प्रकल्प उभारणी केली जाणार आहे.

■ या प्रकल्पांतर्गत सुरुवातीला बदलापूरातून जात असलेल्या टाटा कंपनीच्या वाहिन्यांतून १०० केव्ही वीज उपलब्ध करून दिली जाईल. लवकरच टाटाची ४०० केव्हीची वाहिनीही बदलापूरातून जाणार आहे.

■ त्यावेळी बदलापुरातील ४०० मेगावॅट विजेची मागणीही पूर्ण होणार असल्याचे टाटा कंपनीचे अधिकारी किरण देसले यांनी स्पष्ट केले. तर नगर परिषद या प्रकल्पासाठी आवश्यक सहकार्य करणार असल्याचे मुख्याधिकारी योगेश गोडसे यांनी सांगितले.




झपाटयाने विस्तारणाऱ्या बदलापूर शहरात वाढत्या लोकसंख्येबरोबरच विजेची मागणीही वाढत चालली आहे.त्यामुळे अनेकदा वीज पुरवठ्यात अडचणी येऊन विजेचा लपंडाव सुरू असतो.त्यामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन आमदार किसन कथोरे यांनी महावितरणला टाटा कंपनीकडून वीज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून आमदार किसन कथोरे यांनी सोमवारी कुळगाव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी योगेश गोडसे तसेच टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांसह बदलापूर पूर्वेकडील मोहपाडा येथे टाटा कंपनीच्या वीज प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेची पाहणी केली. या प्रकल्पांतर्गत टाटा कंपनीच्या वीज वाहिन्या बदलापूरातून गेल्या आहेत. त्या वाहिन्यांमार्फत बदलापूर शहरासाठी सुरुवातीला १०० केव्हीं व नंतर ४०० मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे. मात्र हा वीज पुरवठा थेट ग्राहकांना करण्यात येणार नसून महावितरणला केला जाणार आहे.

बदलापूरातील वीज ग्राहकांना महावितरण मार्फतच हा वीज पुरवठा केला जाणार असून वीज ग्राहकांना विजेची बिलेही महावितरणकडून दिली जाणार आहेत. टाटा कडून मिळणाऱ्या या अतिरिक्त विजेमुळे विजेच्या वाढत्या मागणीचा महावितरणवर वाढत असलेला ताण कमी होऊन त्यांना नागरिकांना सुरळीत वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे.

> "टाटा कंपनी आणि महावितरण यांच्या सहकार्याने बदलापुरात चार एकर जागेवर प्रकल्प राबविला जाणार आहे. त्यातून बदलापूर शहरासाठी ४०० मेगावॅट उपलब्ध होईल. त्यामुळे आगामी काळात बदलापूरकरांना अखंड व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होईल.
>
> **किसन कथोरे**
> **आमदार,मुरबाड विधानसभा**

# ठाणे शहराचे तापमान चाळीशी पार



■ **ठाणे** : शहरातील वातावरणात गेल्या काही दिवसांपासून मोठे बदल झाले आहेत. रात्रीच्या वेळेत वातावरणात गारवा जाणवत असला तरी दिवसा मात्र तापमानात मोठी वाढ होऊन ऊन्हाच्या झळा बसत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून शहरातील कमाल तापमान चाळीशी पार गेल्याने दिवसा अंगाची काहीली होत आहे. तर, किमान तापमान १६ ते २० अंश सेल्सिअस इतके नोंदविले गेले असून यामुळे रात्री आणि पहाटेच्या वेळेत गारवा जाणवत आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली. यंदा थंडीचा हंगाम लवकर संपणार असल्याचे अंदाज पर्यावरण तज्ज्ञांकडून वर्तविले जात आहेत. असे असतानाच गेल्या काही दिवसांपासून वातावरणात मोठे बदल झाल्याचे दिसून येत आहे. शहरात सायंकाळनंतर वातावरणात गारवा जाणवत आहे. पहाटेपर्यंत हा गारवा कायम असतो. परंतु सकाळनंतर मात्र तापमानात मोठी वाढ होत असल्याचे पालिकेच्या तापमान केंद्राद्वारे समोर आले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात सहा तापमान केंद्राची उभारणी पालिका प्रशासनाने काही वर्षांपुर्वी केली आहे. डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह, मुंब्रा अग्निशमन केंद्र, दिवा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे महापालिका मुख्यालय, विटावा येथील ठाणे महापालिका शाळा क्रमांक ७२ आणि घोडबंदर येथील ट्रॅफिक पार्क याठिकाणी ही तापमान केंद्र आहेत. यातील डॉ. काशीनाथ नाट्यगृह येथील केंद्र बंद आहे तर, उर्वरित पाचही केंद्र सुरू आहेत. याठिकाणी दररोज नोंद होणाऱ्या तापमानाची पालिका प्रशासनाकडून नोंद घेतली जाते. याच तापमान केंद्राच्या आधारे गेल्या तीन दिवसातील तापमानाची आकडेवारी पहाता शहराचे तापमान चाळीशी पार गेल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत.

# नकली बंदुकीने गोळीबार करून दहशतीचा प्रयत्न

## निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




■ **भिवंडी** : सध्या राज्यात गोळीबाराच्या घटनेमुळे दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या घटना ताज्या असतानाच भिवंडी शहरातील ठाणगेआळी परिसरात दोन तरुणांमधील जुन्या वादातून हाणामारी झाल्याच्या घटनेनंतर हवेत गोळीबार करण्यात आला. प्रसंगावधान बाळगून काही युवकांनी बंदूक हिसकावून घेतल्याने पुढील प्रसंग टळला, मात्र या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. या घटनेची माहिती मिळताच निजामपूर पोलिसांनी दोन्ही गटांच्या तरुणांविरोधात गुन्हा दाखल करत बंदूक जप्त केली. नंतर पोलिसांच्या लक्षात आले की, बंदूक खरी नसून नकली एअरगन आहे. त्यामुळे पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडत एअरगन जप्त केली आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

शहरातील ठाणगेआळी परिसरातील तुषार खारेकर, विशाल भोईर यांच्यात जुना वाद असून, विशाल भोईर यांचा पुतण्या उमेश भोईर व कृष्णा चव्हाण हे दोघे एकमेकांचे मित्र आहेत. ठाणगेआळी परिसरात कृष्णा चव्हाण यांनी तुषार खारेकर याला विचारले की, विशाल काका बरोबर तू का उगाच भांडण करतोस. यावरून कृष्णा आणि तुषार खारेकर यांच्यात बाचाबाची होऊन भांडण सुरू झाले. त्यानंतर कृष्णा यांनी मिखंज पटेल याला मदतीसाठी बोलावले. तुषार खारेकर व मिखंज पटेल यांच्यात जोरदार हाणामारी झाली. मात्र यावेळी मिखंज पटेलच्या कमरेला बंदूक होती. त्यांनी बंदूक काढून हवेत फायरिंग केल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेने परिसरात खळबळ उडाली; परंतु ही बंदूक असली नसून, एअरगन असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सध्या पोलिसांनी तुषार खारेकर व मिखंज पटेल यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून नकली बंदूक जप्त केली आहे.

# मुंब्रा–कळवादरम्यान ३ वर्षांत रेल्वे अपघातात ९५ मृत्यू

■ **मुंब्रा**: मध्य रेल्वेच्या मुंब्रा ते कळवा या दोन रेल्वे स्थानकांदरम्यान सन २०२० ते २०२३ या कालावधीत रेल्वेतून खाली पडल्याने व रेल्वेची धडक बसल्याने तब्बल ९५ जणांचा मृत्यू झाला.यामध्ये२०२३ या वर्षात सर्वाधिक ३८ जणांचा मृत्यू झाला. रेल्वेची ठोकर लागून २० जणांचा तर रेल्वेतून पडल्याने १८ जणांचा मृत्यू झाला. २०२० ते २०२३ दरम्यान रेल्वेतून पडल्याने ३२ जणांचा मृत्यू झाला. तर रेल्वेची ठोकर लागल्याने ६३ जण मृत्यूमुखी पडले. माहिती अधिकार कार्यकर्ते मोहम्मद यूसुफ खान यांनी याबाबत माहिती मागवली होती. २०२० मध्ये रेल्वेतून पडून १२,२०२१ मध्ये १६, २०२२ मध्ये १५ तर २०२३ मध्ये २० जणांचा मृत्यू झाला.रेल्वेतून खाली पडल्याने २०२१ मध्ये १, २०२२ मध्ये १३ व २०२३ मध्ये १८ जणांचा मृत्यू झाला. ठाणे लोहमार्ग पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जी. एस. नावकार यांनी ही माहिती खान यांना दिली आहे.मुंब्रा, कळवा रेल्वे स्थानकांमध्ये उपनगरीय रेल्वे मध्ये मोठी गर्दी होते. त्यामुळे इतक्या मोठया संख्येने प्रवाशांचे अपघातात मृत्यू होत असून रेल्वे प्रशासनाने मुंब्रा, दिवा येथून उपनगरीय रेल्वे सुरु करावी अशी मागणी युसूफ खान यांनी केली आहे.

# नैसर्गिक नदी नाल्यांचे अस्तित्व धोक्यात

## प्रदूषण मंडळ, महापालिकेचे दुर्लक्ष



■ **नालासोपारा** : वसई विरार शहरातील औद्योगिक वसाहतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात औद्योगिक वसाहतीत बांधकाम निर्माण करताना त्याचे योग्य नियोजन या औद्योगिक कंपन्यांकडून केले जात नाही. त्यामुळे औद्योगिक वसाहतीतून निघणाऱ्या रसायनमिश्रित पाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा न उभारलेली नाही. त्यामुळे येथील दूषित पाणी नैसर्गिक नाल्यात सोडल्यामुळे जलपर्णी व जलचर प्राणी मृत झाल्यामुळे नदीत प्रदूषण वाढले आहे.

सर्व औद्योगिक कंपन्यांचे दूषित पाणी शहरातील नाले व नद्यांत सोडले जात आहे. सोडलेल्या पाण्यातून मोठ्या प्रमाणात रसायनाचा फेस निर्माण होत आहे. त्यातून परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे. वसईतील खान कंपाऊंड परिसरातील नैसर्गिक नाल्यात दूषित पाणी सोडल्याने काही दिवसांपासून नैसर्गिक नाल्यातून दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे येथे राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नाल्या शेजारी काही आदिवासी वस्ती असल्याने तेथील नागरिक नाल्याचे पाणी घरगुती वापरासाठी वापरत असत. गेली पाच वर्षे आधी येथील नागरिक नैसर्गिक नाल्याचे पाणी पिण्यासाठी वापरायचे. मासेमारी करायचे. नदी-नाल्यामुळे ग्रामीणमधील नागरिकांचा उदरनिर्वाह व्हायचा. मात्र पाणी दूषित झाल्यामुळे जलचर प्राण्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# डोंबिवलीत देवीचापाडा येथे खाडी किनारी मातीचे भराव, खारफुटी नष्ट करण्याचा प्रयत्न, बेकायदा चाळी उभारण्यासाठी नियोजन



■ **डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील उल्हास खाडी किनारी जेट्टी भागात (गणेश विसर्जन घाट) मातीचे भराव टाकून मागील पाच दिवसांपासून खाडी किनारा बुजविण्याचे काम भूमाफियांनी सुरू केले आहे. खारफुटीचे घनदाट जंगल असलेला भाग मातीचे भराव टाकून बुजविण्यात येत असल्याने पर्यावरणप्रेमी, निसर्गप्रेमी छायाचित्रकार तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. मागील पाच दिवसांपासून डम्परने माती आणून भरती, ओहोटीची सीमा रेषा असलेल्या खाडी किनारी भागात माती टाकली जात आहे. हे मातीचे भराव कोणाच्या निदर्शनास येऊ नयेत म्हणून मातीचे ढीग पोकलेन, जेसीबीच्या साहाय्याने सपाट केले जात आहेत. डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा, मोठागाव, गरीबाचापाडा, गणेशनगर, कुंभारखाण पाडा, कोपर हा एकमेव हरितपट्टा शिल्लक आहे. शहरातील हरितपट्टे विकसित करा, असे आवाहन नुकतेच आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी केले आहे. कुंभारखाणपाडा, देवीचापाडा हरितपट्ट्यात अधिक प्रमाणात बेकायदा चाळी, इमारतींची बांधकामे सुरू आहेत. या बांधकामांचा प्रश्न कायम असताना देवीचापाडा येथे खाडी किनारी जेट्टीच्या भागात भूमाफियांनी मातीचे भराव टाकून खाडी किनारा बुजविण्याचे काम सुरू केले आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सव काळात देवीचापाडा खाडी किनारच्या जेट्टी भागातील खारफुटीची जुनाट झाडे माफियांनी तोडून टाकली होती. खारफुटीचे जंगल नष्ट केले होते. या भागात दरवर्षी पर्यावरण प्रेमी नागरिक खारफुटीची लागवड करतात. त्यांचे संगोपन करतात. ही झाडे नष्ट करण्याचे काम भूमाफियांनी सुरू केले आहे. मातीचा भराव टाकणाऱ्या भूमाफियांना विरोध केला तर त्यांच्याकडून आक्रमक कृती होण्याची भीती असल्याने कुणीही नागरिक, पर्यावरणप्रेमी या विषयावर उघडपणे तक्रार करण्यास किंवा बोलण्यास तयार नाही.

# तोरंगण घाटवळणावर विचित्र अपघात

## अपघातग्रस्त ट्रकच्या ठिकाणीच कारसह दुसरा ट्रक कोसळला



■ **मोखाडा** : मोखाडा आणि त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील मोखाडा हद्दीतील तोरंगण घाटातील भांगेबाबा उतारावरील एक तीव्र वळण हे अपघाती वळण बनले आहे. याठिकाणी एक दिवसआड अपघात होत असल्याचे चित्र आहे. त्यातच याच ठिकाणी एक विचित्र अपघात झाला असून रविवारी रात्री एक ट्रक दरीत कोसळला. नंतर तो ट्रक काढण्यासाठी मालक स्विफ्ट कारमधून आले होते.

याचवेळी त्यांनी वळणाच्या जागेवर कार लावली असता अचानक वरून दुसरा आयशर ट्रक येऊन कारसह थेट दरीत कोसळला. यामुळे अगोदरच दरीत कोसळलेल्या ट्रकवर ही दोन्ही वाहने जाऊन आदळली. यात आयशर ट्रकचा चालक मुसा खान (३२) याचा मृत्यू झाला. मृत खान याचा मृतदेह ट्रक खाली अडकल्याने अद्याप काढण्यात यश आले नाही. तरी ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने याचे प्रयत्न सुरू आहेत. तोरंगण घाटातील हे ठिकाण अतिशय धोकादायक असून नाशिकवरून येताना त्र्यंबकेश्वरच्या नंतर मोठा घाट सुरू होतो. यावेळी मोखाडा हद्द सुरू होताच एक तीव्र उतार आहे. त्याठिकाणी येईपर्यंत वाहनाचे लायनर गरम झालेले असतात. तिथून खाली आल्यानंतर थेट उतार आणि जाग्यावर वळण असल्याने येथे एक दिवसआड अपघात झाल्याचे दिसून येते. अशातच हा मोठा अपघात झाला आहे. एवढे मोठा अपघाती वळण असतानाही याठिकाणी धोक्याची सूचना देणारा फलक नाही. वाहनांचे ब्रेक फेल झाले तर वाहन अडवण्यासाठी काहीच उपाययोजना नाही.

या भागात वाहनांना विश्रांतीसाठी जागा नाही. यामुळे खरे तर याठिकाणी राष्ट्रीय महामार्ग विभागाने याबाबत मोठी उपाययोजना करून लोकांचे जीव वाचवणे गरजेचे आहे. मात्र वर्षानुवर्षे शेकडो अपघात आणि शेकडो जीव जाऊनही याबाबत उपाययोजना होत नसेल तर मग उपाययोजना न करणाऱ्या विभागावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

# डोंबिवलीत अस्तित्वाच्या लढाईसाठी प्राणाच्या आहुतीचे आवाहन

## शिवसेना ठाकरे गटाकडून अभिषेक घोसाळकर यांना भावनिक श्रध्दांजली




■ डोंबिवली शिवसेना ठाकरे गट शहर प्रमुख विवेक खामकर यांनी त्यांच्या फेसबुक अकाऊंटवर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.. शिवसेनेच्या अस्तित्वाच्या लढाईचा यज्ञ आता प्राणांची आहुती मागतोय...मी तयार आहे.

■ तुम्ही आहात का ? असा थेट काळजाला भिडणारा प्रश्न त्यांनी फेसबुकच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. इतकेच नव्हे तर ज्या दिवशी या राज्यावर पुन्हा शिवसेनेचा भगवा डौलाने फडकेल तेव्हाच खऱ्या अर्थाने श्रद्धांजली घोसाळकर अर्पण करेन असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

■ **डोंबिवली** : दोनच दिवसांपूर्वी दहिसर येथे शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांना मॉरिस नोरोन्हा याने फेसबुक कार्यक्रमा दरम्यान गोळ्या घातल्या. यामध्ये अभिषेक घोसाळकर यांचा मृत्यू झाला व मॉरिस याने आत्महत्या केली. या घटनेचे पडसाद आता संपूर्ण महाराष्ट्रात उमटू लागले आहेत. डोंबिवलीत ठाकरे गटाचे शहर प्रमुख यांनी शिवसेनेच्या अस्तित्वाची लढाई, प्राणाची आहुती मागत असल्याचा भावनिक संदेश देणारा लावलेला फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.


या फलकावर राह कुर्बानियों की न वीरान हो,तुम सजाते ही रहना नए काफ़िले, फ़तह का जश्न इस जश्न के बाद है, जिंदगी मौत से मिल रही है गले. बाँध लो अपने सर से कफ़न साथियो,अब तुम्हारे हवाले वतन साथियो असा मजकूर लिहिलेला असून त्याद्वारेच अभिषेक घोसाळकर यांना आगळी वेगळी अशी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. या ओळी खूप भावनिक असून सर्वांच्या हृदयालाच हात घालणाऱ्या आहेत.,त्यामुळे हा फलक डोंबिवलीत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.शिवसेना फुटी नंतर ठाकरे गट आधीच सर्व बाजूनी अडचणीत आलेला आहे.

पक्षाला पुन्हा एकदा उभारी देण्याचे काम पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे करत आहेत .निष्ठावंत शिवसैनिकांना बळ देण्यासाठी ठाकरे पिता पुत्र महाराष्ट्राचा दौरा करत आहेत .कोकण दौऱ्यानंतर आता मुंबईत शाखांना भेटी देण्याचा कार्यक्रम सुरु असताना बोरीवली येथील शिवसेना ठाकरे गटाचे निष्ठावंत असलेले माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची ज्याप्रकारे हत्या करण्यात आली आहे.त्यामुळे शिवसैनिकांमध्ये प्रचंड अशी चिड आणि संताप निर्माण झाला आहे. आता सोशल मिडीयाच्या माध्यमातून ती व्यक्त होत आहे.

# शार्क माश्याच्या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी

■ **पालघर** :मनोर लगतच्या वैतरणा खाडी पात्रात आलेल्या दोनशे किलो वजनी शार्क माशाने मासेमारीसाठी गेलेल्या तरुणाला गंभीर जखमी केले आहे. तरुणाला उपचारासाठी सिल्वासा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुमारे दोनशे किलो वजन असलेला शार्क मासा पकडण्यात मनोर ग्रामपंचायत हद्दीतील गायकवाड डोंगरीच्या ग्रामस्थांना यश आले आहे. वैतरणा खाडी पात्रात ओहोटीच्या वेळी पाण्याचा स्तर कमी झाल्याने शार्क माशाचा वावर वैतरणा खाडी पात्रात मासेमारी करणा[]या ग्रामस्थांना दिसला. शार्क माशाने खाडी पात्राच्या पलीकडे लाकडे आणण्यासाठी गेलेल्या तरुणाला खाडी पात्र ओलांडताना चावा घेत पायाचा लचका तोडला आहे.

# भिवंडीतील अपघातात दोन तरुणांचा मृत्यू



■ **ठाणे** : मुंबई नाशिक महामार्गावरील एका विरुद्ध दिशेने येणाऱ्या डम्परची दुचाकीला धडक बसली. या धडकेत दोन तरूणांचा मृत्यू झाला आहे. शैलेश हळदनकर (३५) आणि मुस्ताक अन्सारी (३५) अशी मृतांची नावे आहेत. दोघेही त्यांच्या कंपनीत जात होते. डम्पर चालकाचा नारपोली पोलीस शोध घेत आहेत. कळवा येथील खारेगाव भागात शैलेश हळदनकर राहत होते. तर मुस्ताक हा गोवंडीमध्ये वास्तव्यास होता. दोघेही भिवंडीतील वस्त्र तयार करणाऱ्या कंपनीत कामाला होते. मुस्ताक हा शिवणकाम करत होता. तर, शैलेश त्याचा सहकारी आहे. सोमवारी सकाळी मुस्ताक आणि शैलेश दोघेही दुचाकीवरून कामाला जात होते. त्यावेळी मुस्ताक दुचाकी चालवित होता. ते मानकोली नाका परिसरात आले असता, या मार्गावर एका डम्पर चालकाने विरुद्ध दिशेने डम्पर चालवित त्यांच्या दुचाकीला धडक दिली. मुस्ताक आणि शैलेश दोघेही डम्परच्या दोन्ही चाकाखाली आले. डम्परची चाके त्यांच्या शरिर आणि डोक्यावरून गेली. त्यामुळे दोघांचा मृत्यू झाला. घटनेनंतर डम्पर चालक फरार झाला. याप्रकरणी सोमवारी सायंकाळी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी घटनास्थळावरून डम्पर जप्त केला आहे. तसेच चालकाचा पोलीस शोध घेत आहेत.

# ३०० हून अधिक हॉटेलांची सुरक्षा वाऱ्यावर

■ **पनवेल** : हायवे ब्रेक या हॉटेलला लागलेल्या आगीच्या घटनेमुळे खारघरमधील तीनशेहून अधिक हॉटेले व उपाहारगृह चालकांनी सिडकोच्या अग्निशमन यंत्रणेने सुचविलेल्या सर्व नियमांचे पालन केले आहे का असा प्रश्न निर्माण झाला आहे. आपत्तीवेळी सिडको अग्निशमन दलाची सेवा तातडीने हवी असणाऱ्या खारघरच्या शेकडो हॉटेल मालकांनी अद्याप या यंत्रणेकडून परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया केली नसल्याचे समोर आले आहे. खारघरमधील रविवारी आगीच्या घटनेमुळे निवासी इमारतीमध्ये तळमजला आणि पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर चालणाऱ्या हॉटेल व उपाहारगृह चालकांमुळे संपूर्ण निवासी इमारतीला धोका होऊ शकतो असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. हॉटेल चालविण्यासाठी पोलीस, पनवेल पालिका, आरोग्य आणि अग्निशमन यंत्रणेच्या परवानगीची गरज असते. परंतु अद्याप खारघर नोडचे हस्तांतरण पनवेल महापालिकेकडे झाले नसल्याने हॉटेल व्यावसायिकांचे फावले आहे. खारघर उपनगर वगळता पनवेल महापालिका क्षेत्रातील इतर परिसरातील हॉटेल व उपहारगृह व्यावसायिकांना पनवेल पालिकेच्या अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी पालिकेवर अवलंबून राहावे लागते.

# दोन वर्षीय मुलीला मिळाली दृष्टी, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात पार पडली मोतीबिंदू शस्त्रक्रिया



■ **ठाणे** : येथील ठाणे जिल्हा सामान्य रूग्णालयात दोन वर्षीय मुलीची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली. मुलीच्या डोळ्यांवर लेझर मशिनद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली असून या शस्त्रक्रियेच्या माध्यमातून तिला दृष्टी देण्यात आली आहे. नाशिक येथील इगतपुरी परिसरात राहणाऱ्या दोन वर्षीय मुलीला दोन्ही डोळ्यांनी दिसत नव्हते. केवळ प्रकाशाची संवेदना तिला जाणवत होती. तिची डोळ्यांची तपासणी केली असता जन्मजात मोतीबिंदू असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर, तिला ठाणे जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले. तिची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शारीरिक तपासणी करण्यात आली. या मुलीवर आठवडाभर रुग्णालयात उपचार सुरू होते. नुकतेच तिच्या डोळ्यांवर लेझर मशिनद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली. दोन वर्षाच्या मुलीच्या दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदू असल्याने शस्त्रक्रिया करणे आव्हानात्मक होते. ही शस्त्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज माहांगडे यांच्या मार्गदशार्खाली पार पडली. भूलतज्ज्ञ डॉ. प्रियांका महांगडे, डॉ.रुपाली यादव यांच्या मदतीने तिच्या डोळ्यांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पडली असल्याची माहिती नेत्र तज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली. लहान वयात मुलीच्या दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदु असल्याने तिला केवळ प्रकाश संवेदना जाणवत होती. तिला भूल देऊन त्यानंतर शस्त्रक्रिया करणे आव्हानात्मक होते. मात्र नेत्रविभागातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी हे आव्हान यशस्वीपणे पार पाडले. तसेच सर्व डॉक्टर आणि कर्मचारी हे रूग्णांची आत्मीयतेने सेवा करण्यासाठी प्रयत्न शील असतात.

**- डॉ. कैलास पवार , जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे.**